**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.1** **Sept – Oct 2022**

# नागपूर शहरातील नागरी सहकारी बँक व व्यापारी बँकातील कर्मचा-यांचे तुलनात्मक अध्ययन

**प्रा. डॉ. संध्या मधुकर काकडे**
**बॅरि शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा**
***Corresponding Author-* प्रा. डॉ. संध्या मधुकर काकडे**
Email id: abhaykakde105@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7276804**

**प्रस्तावना :-**

नागपूर शहरातील सहकारी बँकातील व राष्ट्रीयकृत बँकातील कर्मचा-यांची तुलनात्कम अभ्यास असतांना फक्त लेखापाल ते चपराशी या पदापर्यतच्या कर्मचारी वर्गाचाच विचार करण्यात आला आहे. वरिल कर्मचा-यांना पुरविण्यात येणा-या कर्जाविषयक सुविधा जसे, धराकरिता कर्ज, वाहनाकरता कर्ज, मुलीच्या मुलांच्या शिक्षणाकरिता व लग्नाकरिता येणा-या बाबीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. हया बँकांच्या कर्मचा-यामध्ये विविध बाबतीत आढळलेल्या तफावतीचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. या मुख्यतः कर्मचा-यांचे वेतनमान राष्ट्रीयकृत बँक व नागरी सहकारी बँका यांचे वेतनमानातील फरक यांची तुलना आणि त्यांच्या कामाच्या तासाविषयी माहिती व त्यांचा कार्यभाराची विभागणी यात केली आहे. सहकारी बँकातील कर्मचा-यांना अधिक कामाचा मोबदला कशाप्रकारे मिळतो त्यांचा विचार केला आहे. राष्ट्रीयकृत बँका व नागपूर नागरी सहकारी बँकांच्या कर्मचा-यांना बँकेव्दारे देण्यात येणारे विविध स्वरूपाचे कर्ज व त्यावरील व्याजदर यांची माहिती देण्यात आली आहे आणि शेवटी कर्मचारी कल्याणाच्या योजना जसे, निवास व्यवस्था, मनोरंजन व खेळ, वाचनालय, वैद्यकीय सवलत आणि प्रवासाची सवलत याची सविस्तर माहिती तुलनेच्या स्वरूपात करण्यात आली आहे. हया बँकेती कर्मचा-यामध्ये विविध बाबतीत आढळलेल्या तफावतीचे स्पष्टीकरण पुढे करण्यात आले आहे.

**कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता -**

नागपूर शहरातील सहकारी बँकातील कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता पुढील तक्त्यात दर्शविली आहे आणि त्यासोबत शहरातील नागरी सहकारी बँक व महिला नागरी सहकारी बँका यांचा सुध्दा अभ्यास करणे गरजेचे वाटले. कारण या दोन्ही बँका जर नागपूर शहरात नसल्या तर आणखी नागपूर सहकारी बँकेची स्थिती चांगली दिसली असती. हया कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता पुढील तक्त्यात दर्शविली आहे. मात्र ज्या राष्ट्रीयकृत बँका नागपूर शहरात आहे. त्याचाच विचार हयामध्ये केला आहे. राष्ट्रीयकृत बँकेतील कर्मचारी जवळपास सर्वच पदवी व पदव्युत्तर पर्यंत शिक्षण घेतलेली आढळली. व्यवस्थापक, अधिकारी वर्ग व लेखापाल कारकून हे सर्व पदवी व पदव्युत्तर पर्यंत शिक्षण घेतलेले आढळते. मात्र दप्तरी य चपराशी हे सुध्दा 10 वी व 12 पर्यंत शिक्षण घेतल्याने आढळून आले. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकेतील कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता देणे गरजेचे वाटत नाही.

**कर्मचा-यांचे वेतनमान –**

नागरी सहकारी बैंक व राष्ट्रीयकृत बँकातील कर्मचा-यांच्या वेतनमानाची तुलना पुढील तक्त्यावरून दर्शविण्यात आली आहे.

**वेतनमान दर्शविणारा तक्ता**

| बँकेचे नाव | कर्मचा-यांच्या कामाचा हुद्दा | वेतन श्रेणी |
|---|---|---|
| नागपूर नागरी सहकारी बैंक | कारकून रोखपाल | 2050-75-2775 |
| राष्ट्रीयकृत (व्यापारी) बैंक | कारकून रोखपाल | 4410-16550 |
| नागपूर नागरी सहकारी बैंक | दप्तरी | 4400-3750 |
| राष्ट्रीयकृत (व्यापारी) बैंक | दप्तरी | 4300-18000 |
| नागपूर नागरी सहकारी बैंक | चपराशी | 1300-3325 |
| राष्ट्रीयकृत (व्यापारी) बैंक | चपराशी | 2200-4800 |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, उपरोक्त दोन्ही बँकातील कर्मचा-यांच्या वेतनमानात बरीच तफावत आहे. राष्ट्रीकृत (व्यापारी) बँकातील कर्मचा-यांच्या वेतनमानाच्या तुलनेत सहकारी बँकातील कर्मचा-यांचे वेतनमान कमी आहे.

**कामाचे वेळ व तास -**

नागपूर शहरातील सहकारी बँक राष्ट्रीयकृत बँकातील कर्मचा-यांच्या कामाच्या वेळा व कामाचे तास यासंबंधीची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

**कामाच्या वेळा दर्शविणारा तक्ता**

| दिवस | नागपूर शहरातील सहकारी बँक | | राष्ट्रीयकृत बँक | |
|---|---|---|---|---|
| | कामाच्या वेळा | रोख व्यवहाराची | कामाच्या वेळा | रोख व्यवहाराची वेळ |
| सोमवार ते शुक्रवार | 10.00 ते 6.00 | 10.30 ते 2.30 | 10.00 ते 6.00 | 10.30 ते 4.30 |
| शनिवार | 10.00 ते 12.30 | 10.30 ते 2.30 | 10.30 ते 2.30 | 10.30 से 1.30 |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, उपरोक्त दोन्ही बँकांमध्ये कामाचे तास सारखेच (तास) आहेत. मात्र रोख व्यवहाराच्या वेळेमध्ये तफावत आहे. राष्ट्रीकृत बँकातील कर्मचा-यांना नागपूर नागरी सहकारी बँकातील कर्मचा-यापेक्षा सोमवार ते शुक्रवार या सहाही दिवशी रोख व्यवहार 120 मिनिटे अधिक करावे लागतात.

**अधिकाम -**

नागपूर नागरी सहकारी बँकेतील कर्मचा-याना अधिकामाचा मोबदला पुढीलप्रमाणे मिळतो.

रोजच्या कामाच्या दिवसात केलेल्या अधिकामाचा प्रत्येक तासाचा मोबदला 1 तासाच्या पगाराइतका देण्यात येतो.

सुटीच्या दिवशी मात्र अधिकामाचा प्रत्येक तासाला 2 तासांच्या पगाराइतका मोबदला मिळतो.

नागरी सहकारी बँकेत मात्र अधिकाम करण्यासंबंधीची कोणतीही तरतूद नाही. कर्मचा-यांनी अधिकाम केल्यास त्यांना त्या अधिकामाचा मोबदला मिळत नाही.

राष्ट्रीयकृत बँकामध्ये अधिकामाचे तास व त्यांचा मोबदला यासंबंधीच्या तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

सोमवार ते शुक्रवार - दररोज जास्तीत जास्त 2 तास

शनिवार - जास्तीत जास्त 4 तास

हया अधिकामाच्या मोबदल्याची गणणा कर्मचा-यांच्या पगारावरून करण्यात येते. निरनिराळया वेतन श्रेणीतील कर्मचा-यांना अधिकामाचा मोबदला विविध प्रकारे मिळतो.

**रजा -** नागरी सहकारी बँक व राष्ट्रीयकृत बँकामधील कर्मचा-यांना मिळणा-या विविध रजेसंबंधी तफावत पुढील तक्त्यावरून दर्शवितात आली आहे.

**रजेचे स्वरूप दर्शविणारा तक्ता**

| बँकेचे नांव | रजेचे स्वरूप | | | |
|---|---|---|---|---|
| | आकस्मिक रजा | हक्काची रजा | आजारपणाच्या रजा | मातृत्वलाभ रजा |
| सहकारी बँक | वर्षातून 12 दिवस | वर्षातून 33 दिवस | पूर्ण नौकरीत 120 दिवस | तरतूद नाही |
| राष्ट्रीयकृत बँक | वर्षातून 15 दिवस | वर्षातून 30 दिवस | पूर्ण नौकरीत 180 दिवस | एकूण 90 दिवस |

यावरून असे निदर्शनास येते की, नागपूर नागरी सहकारी बँक आणि राष्ट्रीयकृत बँकमध्ये आकस्मित आणि हक्काच्या रजेत फक्त तीन दिवसांची तफावत आहे. आजारपणाच्या रजेसंबंधी 60 दिवसांची तफावत आहे. नागपूर नागरी सहकारी बँकेत व जिल्हा परिषद कर्मचारी नागरी सहकारी बँकेत एकही स्त्री कर्मचारी कार्यरत नसल्यामुळे उपरोक्त दोन्ही बँकांच्या संचालक मंडळाने त्यांच्या संबंधीच्या तरतूदी सुध्दा केलेल्या नसल्यामुळे आढळून आले. मात्र राष्ट्रीकृत बँकांमध्ये स्त्री कर्मचा-यांना एकुण 90 दिवसाच्या मातृत्वलाभ रजा मिळतात.

**कर्मचारी कल्याण योजना -** नागपूर नागरी सहकारी बँक व राष्ट्रीकृत बँकामध्ये कल्याणाच्या विविध योजनेअंतर्गत कर्मचा-यांना मिळणा-या सवलतीची तुलना पुढील तक्तयात दर्शविलेली आहे.

**कर्मचारी कल्याणाच्या योजना दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | योजनेचे स्वरूप | सहकारी बैंक | राष्ट्रीयकृत बैंका |
|---|---|---|---|
| 1. | निवास व्यवस्था | कर्मचा-यांना बँकेव्दारे निवास व्यवस्था पुरविण्यासंबंधी तरतूद नाही. | कर्मचा-यांना बँकेव्दारे निवास व्यवस्था पुरविण्यासंबंधी तरतूद नाही. |
| 2. | मनोरंजन व खेळ | कर्मचा-यांचे मनोरंजन व खेळासंबंधी बँकेत कोणतीच तरतूद नाही. | कर्मचा-यांचे मनोरंजन व खेळासंबंधी बँकेत तरतूद केलेली आढळते. |
| 3. | वैद्यकिय सवलती | प्रत्येक कर्मचा-याला बँकेव्दारे दरवर्षी 3000 रू. बिनव्याजी स्वरूपाची अग्रीम राशी मिळण्याची तरतूद आहे. | प्रत्येक कर्मचा-याला बँकेव्दारे पूर्ण खर्च मिळण्याची तरतूद आहे. |
| 4. | प्रवास सवलत | या बँकेतील कर्मचा-यांना प्रवास सवलत मिळत नाही. | या बँकेतील कर्मचा-यांना प्रवास सवलत मिळते. |
| 5. | घर बांधणी करिता सोयी | या बँकेतील कर्मचा-यांना घर बांधणीकरिता तरतूद आहे. | या बँकेतील कर्मचा-यांना घर बांधणीकरिता तरतूद आहे. |
| 6 | शिक्षणाची सोय | शिक्षणासाठी 7.5 टक्के व्याजदराने कर्ज प्राप्त होते. | शिक्षणासाठी 4 टक्के व्याजदराने कर्ज प्राप्त होते. |
| 7. | लग्न समारंभ | यासाठी 1 लक्षपर्यंत कर्ज प्राप्त होते. | यासाठी मर्यादित कर्ज 4 वर्षाकरिता प्राप्त होते. |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की उपरोक्त दोन्ही बँकांच्या अल्प मुदतीच्या कर्जात व त्यावरील व्याजदरात फारशी तफावत नाही. मध्यम व दिर्घ मुदतीच्या कर्जात व व्याजदरात मात्र बरीच तफावत असल्याचे आढळून येते. वाहनाकरिता दिल्या जाणा-या कर्जावर राष्ट्रीयकृत बँकेदारे फक्त 4 टक्के व्याजदर आकारला जातो तर नगरी सहकारी बँकेव्दारा 5 टक्के व्याजदर आकारला जातो. सणाकरिता मिळणा-या कर्जावर वरील दोन्ही बँका व्याज आकारत नाही.

**निष्कर्ष :-**

1. व्यापारी बँकामध्ये ज्याप्रमाणे औपचारिक व वैज्ञानिक पद्धत आहे. कर्मचा-यांची भरती करण्याची पद्धत आहे. त्याचप्रमाणे सहकारी क्षेत्रातील या बँकात सुध्दा असावी,
2. व्यापारी बँकातील व अभ्यासार्थ घेतलेल्या नागपूर नागरी सहकारी बँक यांतील कर्मचा-यांच्या वेतनमानाचा अभ्यास केल्यानंतर त्यात बरीच तफावत आढळून आली. त्यामुळे ही तफावत दूर करण्यात यावी.
3. अभ्यासार्थ घेतलेल्या नागपूर नागरी सहकारी बँकापैकी फक्त नागपूर नागरीक अधिकामाचा मोबदला मिळण्याची तरतूद नाही. बँकेतील कर्मचा-यांनाही त्यांनी केलेल्या अधिकामाचा मोबदला मिळण्याची तरतूद करण्यात यावी.

**संदर्भग्रंथ सूची-**

1. सहकारी संस्थाने व्यवस्थापन, वा. भि नातू सेठ पब्लिकेशन, मुंबई.

2. सहकारी मुलतत्वे, मदन, सेठ पब्लिकेशन मुंबई.

3. व्यवसाय प्रशासन सिध्दांत आणि पध्दती, डॉ. प्रभाकर देशमुख, पिंपळापुर प्रकाशन, नागपूर

4. कामगार संघ आणि औद्योगिक संबंध, व.भ. कर्णिक, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

5. भारतीय कामगार समस्या व कामगार विधान, आंबेडकर पाटील, विद्या प्रकाशन नागपूर

6. सामाजिक संशोधन व तत्वे व पध्दती, यं.ना. घाटोळे, मंगेश प्रकाशन, नागपूर

7. नागरी सहकारी बँका, शंकर बर्डे विकास प्रकाशन, नागपूर.

8. बँकिंगची तत्वे आणि बँकिंग पध्दती, प्रा. डॉ. कुरलकर, फरके प्रकाशन, कोल्हापूर

9. नागरी सहकारी बँक, सांबारे, साईनाथ, प्रकाशन, नागपूर.

10. भारतीय बैंकिंग, प्रा. भोसले, प्रा. काटे, पायल प्रकाशन, नागपूर

**प्रा. डॉ. संध्या मधुकर काकडे**